**शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई या कार्यालयातील वाहतूक विभागातील वाहनचालक यांना प्रत्येक सात दिवसांच्या कालावधीत कामाचे दिवस <u>निश्चित करण्याबाबत...</u>**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-१४२२/प्र.क्र.१९४/राशि-३**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २२ एप्रिल, २०२६

**वाचा :**

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः शापसे-१००२/(प्र.क्र.६२/२००२)/२८-अ, दिनांक २७ ऑगस्ट २००३
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः शापसे-१००२/(प्र.क्र.६२/२००२)/२८-अ, दिनांक २२ जून २०१०
३) शासन शुद्धीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः शापसे-१००२/(प्र.क्र.६२/२००२)/२८-अ, दिनांक ५ जुलै २०१०
४) शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-संकीर्ण-१४२२/प्र.क्र.१२३/३१(शापसे), दिनांक २५ ऑगस्ट २०२२ (इतिवृत्त)
५) नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई यांचे पत्र क्रमांक-शापसे/प्रशा/२०२२/१७१६, दिनांक २४ नोव्हेंबर २०२२
६) नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई यांचे पत्र क्रमांक-शापसे/प्रशा/२०२२/१८२८, दिनांक ५ डिसेंबर २०२२
७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः इपीडी-२३२४/प्र.क्र.४०/२०२४/राशि-३, दिनांक २७ सप्टेंबर २०२४
८) मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१

**प्रस्तावना :**

शासकीय परिवहन सेवा,वरळी मुंबई या कार्यालयाची स्थापना फेब्रुवारी १९५१ मध्ये झाली आहे. हे कार्यालय दिनांक २९ डिसेंबर १९८१ पर्यंत गृह विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत होते. त्यानंतर हेच कार्यालय राजपत्र, सामान्य प्रशासन विभाग दिनांक ३० डिसेंबर १९८१ नुसार सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखाली आणण्यात आले.

२. शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई या कार्यालयातील वाहनचालक हे मा.राष्ट्रपती / उपराष्ट्रपती, मा. पंतप्रधान, मा.सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, मा.केंद्रीय मंत्री / राज्यमंत्री, इतर राज्यातील महाराष्ट्राच्या भेटीवर येणारे मा.राज्यपाल, मा.मुख्यमंत्री / उपमुख्यमंत्री, मा. उच्च न्यायालयाचे मा.मुख्य न्यायाधीश, मा.मुख्य सचिव, केंद्र शासनातील सचिव, मा. राज्य अतिथी (State

Guest) व इतर मान्यवरांना परिवहन सेवा देत असतात. हे मान्यवर मुंबई भेटीवर आल्यानंतर कमीत कमी पाच दिवसांचा मुंबई / महाराष्ट्र दौरा कार्यक्रम असतो. त्या दरम्यान महत्त्वाच्या व अतिमहत्त्वाच्या मान्यवरांना Y, Z, Z+ अशी सुरक्षा असते. यामुळे मान्यवरांच्या वर्दीवर वाहनचालकांना सुरक्षेच्या दृष्टीकोनातून वाहन कोठेही सोडून जाता येत नाही. मान्यवरांच्या वर्दीवर वाहनचालकांस अतिथीचे निर्गमन होईपर्यंत २४ X ७ कर्तव्य बजावावे लागते. शासकीय परिवहन सेवेतील वाहनचालकांना तीन पाळयांमध्ये कर्तव्यावर यावे लागते. तसेच वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांच्या भेटी दरम्यान परिवहन व्यवस्थेचे कामकाज देखील पाहण्यात येते.

३.१. मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१ (Motor Transport Worker Act, 1961) मधील कलम-२६ नुसार अतिकालिक भत्ता मिळावा म्हणून शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई यांच्या कार्यालयातील वाहनचालकांनी मा.कामगार न्यायालय, मुंबई येथे Application (IDA) Nos.८३७ to ८४१/८१, १४६३ to १४७५/८२, १८३ to १८९/८७, २७ to ३१/८२, १३५० to १३५७/८४, ६७/८६, १४३० to १४४१/८४ दावे दाखल केले होते. या एकत्रित दाव्यांमध्ये मा.कामगार न्यायालयाने दिनांक २ मे, १९८९ रोजी वाहनचालकांची अतिकालिक भत्त्याची मागणी मान्य केली. या निर्णयाविरुद्ध मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठाकडे दाखल केलेल्या रिट अर्ज क्रमांक-४१२३/१९८९ मध्ये "शासकीय परिवहन सेवा ही मोटार परिवहन उपक्रम आहे व सेवेत काम करणारे वाहनचालक मोटार परिवहन कामगार आहेत" असा निर्णय मा.उच्च न्यायालयाने दिनांक १९ एप्रिल, १९९५ रोजी दिला. मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरुद्ध मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या सिव्हिल ॲप्लिकेशन क्रमांक-१२६४३/१९९२ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २१ मार्च, २००१ रोजी मा.उच्च न्यायालयाचा उक्त निर्णय कायम ठेवला.

३.२ मा.सर्वोच्च न्यायालयाच्या वरील न्यायनिर्णयानुसार "शासकीय परिवहन सेवेत वाहन चालकांची नियुक्ती जरी महाराष्ट्र नागरी सेवा नियमामधील सेवा शर्तीनुसार झाली असली, तरी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २१ मार्च, २००१ रोजी मा.उच्च न्यायालयाचा वरील निर्णय कायम ठेवल्यामुळे, शासकिय परिवहन सेवेतील वाहनचालकांना मोटार परिवहन कामगार अधिनियम १९६१ लागू राहिल. त्यामुळे त्यांना यापुढे महाराष्ट्र नागरी सेवा नियमामधील सेवा शर्ती लागू राहणार नाहीत. त्यांना मोटार परिवहन कामगार अधिनियम १९६१ नुसार सेवा शर्ती लागू राहतील याप्रमाणे शासन निर्णय दिनांक २७ ऑगस्ट, २००३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

३.३. त्यानंतर या विभागाच्या दिनांक २२ जून, २०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक २७ ऑगस्ट २००३ चा शासन निर्णय रद्द करण्यात आला. या शासन निर्णयानुसार शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई या कार्यालयातील वाहनचालकांना मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१ अनुसार अतिकालिक भत्ता देय राहिल. तसेच त्यांच्या अन्य सर्व सेवा शर्तीसाठी महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ लागू राहिल, असा निर्णय घेण्यात आला.

३.४. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ५ जुलै, २०१० रोजीच्या शासन शुद्धीपत्रकान्वये उक्त दिनांक २२ जून, २०१० च्या शासन निर्णयातील पहिल्या परिच्छेदातील "महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ लागू नाही, असा निर्णय घेण्यात आला आहे" या वाक्याऐवजी "महाराष्ट्र नागरी सेवा नियमामधील सेवा शर्ती लागू राहणार नाहीत" तसेच तिसऱ्या परिच्छेदातील "त्यांच्या अन्य सर्व सेवा

शर्तीसाठी महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ लागू राहिल" या वाक्याऐवजी "त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियमांमधील सेवा शर्ती लागू राहतील" अशी सुधारणा करण्यात आली.

४. शासकीय परिवहन सेवेतील वाहनचालकांना (मोटार परिवहन कामगार अधिनियम १९६१ व महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१) हे दोन नियम लागू केलेले असल्यामुळे, वाहनचालकांना अतिकालिक भत्ता व पाच दिवसांचा आठवडा मंजूर करण्यासंदर्भात तांत्रिक अडचणी येत होत्या. याबाबत मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९ जुलै, २०२२ रोजी बैठक झाली. त्या बैठकीत "शासकीय परिवहन सेवेतील वाहनचालकांना पाच दिवसांचा आठवडा लागू केल्यास शासनावर पडणाऱ्या अतिरिक्त बोजा संदर्भातील आकडेवारीसह प्रस्ताव नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा यांनी प्रशासकीय विभागास सादर करावा" असे निर्देश दिले होते. तसे बैठकीचे इतिवृत्त संदर्भ क्र. ४ येथील दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी निर्गमित करण्यात आले. या निर्देशानुसार नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी,मुंबई यांनी संदर्भ क्र. ५ व ६ येथील पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला होता.

६. शासकीय परिवहन सेवेतील वाहनचालकांना अतिकालिक भत्ता मंजूर करतांना, सदरहू सेवेतील वाहनचालकांना मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१ व महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ असे दोन नियम लागू असून, त्यातील एकच नियम लागू होईल यानुषंगाने विभागाने सर्वकष आढावा घ्यावा, असे वित्त विभागाने अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार विधि व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात आले असता, त्या विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-०२/E-file/Civil/ २०२६/२०/॰A॰ Br., दिनांक १९ जानेवारी, २०२६ अन्वये खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

"New recruitment of drivers cannot be made by applying the Maharashtra Civil Services Rules. The General Administration Department must undertake such recruitment strictly in accordance with the provisions of the Motor Transport Workers Act 1961, and any applicable rules or statutory scheme framed thereafter. This opinion is rendered in conformity judgments of Hon'ble Bombay High Court and the Hon'ble Supreme Court and the opinion of the Hon'ble Advocate General dated 03.03.2003."

७. शासकीय परिवहन सेवेतील वाहनचालकांना पाच दिवसांचा आठवडा मंजूर करण्याबाबत श्री. शिवाजी सुखदेव कुमठकर व इतर यांनी महाराष्ट्र शासन यांच्याविरुद्ध मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठासमोर दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक-९०६६/२०२१ (रिट याचिका क्र.९९२१२/२०२०) मध्ये मा.न्यायालयाने दिनांक २८ जानेवारी, २०२६ रोजी खालील प्रमाणे निर्णय दिला आहे.

"Since we find that the grievance of the Petitioners was considered in the meeting held on 19.07.2022 and certain course of action was chartered, we direct State of Maharashtra through the Chief Secretary to take a conscious decision upon the request of the Petitioners, if no decision is yet taken and we expect the Chief Secretary to take forward the process which was initiated in the meeting of 19.07.2022 and upon a decision being arrived at, which shall include not only the financial repercussion, but all other relevant factors necessary for determining the extant of the emergency services including the services of the Protocol Department, within a period of 3 months from today.

We also direct that the said decision shall be communicated to either of the Petitioners through the Transport Department."

८. विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी वरील परिच्छेद-६ मध्ये दिलेल्या अभिप्रायानुसार शासकीय परिवहन सेवेतील वाहनचालकांना मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१ लागू आहे. मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१ अंतर्गत कलम-१९(१) नुसार "प्रत्येक सात दिवसांच्या कालावधीत एक विश्रांतीचा दिवस सर्व मोटार परिवहन कामगारांना अनुज्ञेय राहिल," अशी तरतूद आहे. त्यानुसार शासकीय परिवहन सेवेतील वाहतूक विभागातील वाहनचालक यांना सेवा शर्तीसाठी मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१ व महाराष्ट्र नागरी सेवा नियम यापैकी एकच नियम लागू करण्याची व त्यांचे प्रत्येक सात दिवसांच्या कालावधीत कामाचे दिवस निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :</u>**

सामान्य प्रशासन विभागाचे संदर्भ क्र. १ व २ येथील शासन निर्णय व संदर्भ क्र. ३ येथील शासन शुद्धीपत्रक या शासन निर्णयाव्दारे अधिक्रमित करण्यात येत आहेत.

२. शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई या कार्यालयाच्या आस्थापनेवरील वाहतूक विभागातील गट-क संवर्गातील वाहनचालक यांना मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१ (Motor Transport Worker Act, 1961) मधील सेवा व शर्ती लागू राहतील. सदर अधिनियमाच्या कलम-१९(१) नुसार शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई या कार्यालयाच्या आस्थापनेवरील वाहतूक विभागातील वाहनचालक यांना प्रत्येक सात दिवसांच्या कालावधीत एक दिवस विश्रांतीसाठी देय राहिल.

३. हा शासन निर्णय, विधि व न्याय विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-02/E-file/Civil/2026/20/'A' Br., दिनांक १९ जानेवारी २०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा सांकेतांक क्र. २०२६०४२२१८१०२०६८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

CHANDRAKANT KRISHNA MORE

Digitally signed by CHANDRAKANT KRISHNA MORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTM, 2.5.4.20=11AC200219EDB36F7777EE1101657BEA427109026722812 2B638D6F2CDEDAD62, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2314CF333E070F9936792BC95890FA89B2F617A931B2B577B703FA858F3DF433, cn=CHANDRAKANT KRISHNA MORE
Date: 2026.04.22 18:11:33 +05'30'

**( चंद्रकांत कृ. मोरे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई

२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

३) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम ) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

४) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

५) मा. मंत्री, पणन, राजशिष्टाचार यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान सचिव (कामगार), उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) कामगार आयुक्त, बांद्रा, मुंबई.
१२) संचालक, शासकीय परिवहन सेवा, वरळी मुंबई.
१३) नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई.
१४) कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) कक्ष अधिकारी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) कक्ष अधिकारी, उद्योग उर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई
१७) श्री.शिवाजी सुखदेव कुमठकर, वाहनचालक (शासकीय परिवहन सेवा, मुंबई यांच्यामार्फत)
१८)निवड नस्ती -राशि-३